**नि. फौ.ख.क्र. ७५/२०१८**
**सरकार वि. मोतीलाल**
नि. क्र. २९

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ८ ची शपथेवर जबानी</u>**

माझे नांवः – अनिल संतप्रसाद तिवारी

अंदाजे वयः – ६१ वर्षे, व्यवसाय– सेवानिवृत्त

राहणारः – पटगावरी, तह. रामटेक, जि. नागपूर

**<u>सरतपासणीः सरकारतर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्री. ए.आर. काळे यांच्यातर्फे</u>**

**१.** मी दिनांक ०४.०४.२०१८ ते १५.०५.२०१८ पर्यंत मी सावनेर येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होतो. दिनांक ०४.०४.२०१८ रोजी मला पोलीस निरीक्षक साहेबांनी अपराध क्रमांक २१६/२०१८ कलम ३२४,५०४,५०६ चा तपास माझ्याकडे दिला होता. त्यानंतर मी पंचनामा करण्यासाठी माझ्या शिपायासह मौजा पिपळा किनखेडा येथे गेलो. तेथे फिर्यादीला भेटलो, दोन पंचांना समन्स पाठविले. पंच आल्यानंतर मी पंचासमक्ष फिर्यादीने दाखविल्याप्रमाणे घटनास्थळ पंचनामा तयार केला. आता मला सुचनापत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. सुचनापत्राला **<u>निशाणी क्र. ३०</u>** देण्यात येते. आता मला निशाणी क्र. १२ वरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. तो मी पंचांना वाचून दाखविला होता. मी आरोपीकडून काठी जप्त केली. आता मला निशाणी क्र. १३ वरील जप्ती पत्रक दाखविण्यात आले. त्यावर माझी, आरोपीची व पंचांची सही आहे. जप्त लाठी मी हेड मोहोररकडे जमा केली. आता मला मुद्देमाल जप्त केल्याची पावती दाखविण्यात आली. त्यावर माझी व हेड मोहोरर यांची सही आहे. त्याला **<u>निशाणी क्र. ३१</u>** देण्यात येत आहे.

२. त्यानंतर मी आरोपीला अटक केले. आता मला आरोपींचा अटक फॉर्म दाखविण्यात आला. त्यावर आरोपींची व माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. अटक फॉर्मला अनुक्रमे **<u>निशाणी क्र. ३२ व ३३</u>** देण्यात येत आहे. त्यानंतर मी साक्षीदारांचे बयान नोंदविले. मी विद्याधर फुलारे यांचे बयान त्यांच्या सांगण्यानुसार नोंदविले होते. आता

मला त्याच्या बयानातील अधोरेखांकीत भाग अ वाचून दाखविण्यात आला. तो मी त्याच्या सांगण्यानुसार नोंदविला होता. त्याला **<u>निशाणी क्र. ३४</u>** देण्यात येत आहे. आता मला मी वैद्यकीय अधिकारी, सावनेर यांना पाठविलेले क्युरीपत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **<u>निशाणी क्र. ३५</u>** देण्यात येत आहे. मी जप्त केलेली काठी मला दाखविल्यास ओळखू शकतो. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो. आता मला जी.पी.क्र. २०/२०१८ वरील काठी दाखविण्यात आली. ही तिच आहे. त्याला वस्तु अ देण्यात आलेले आहे. त्यानंतर मी आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**सरतपास पूर्णः–**

**<u>आरोपीतर्फे उलटतपासणीः– वकील श्री गजभिये यांच्यातर्फे</u>**

**३.** हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचाच्या दोन्ही पंचाने सहकार्य केलेले नाही त्यामुळे मी खोटा घटनास्थळ पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे आरोपीच्या अंगणातील आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या समोर मोठा रस्ता आहे व आजुबाजुला घरे आहेत तसेच परिसर गजबजलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरील प्रकरणातील सर्व साक्षीदार हे फिर्यादीचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, तेथे आजुबाजुला स्वतंत्र साक्षीदार होते व मी त्यांचे बयान नोंदविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व फिर्यादीमध्ये पूर्वीपासून वाद असल्याचे माझ्या तपासात समजले होते. घटनास्थळावर रक्ताचे डाग आढळून आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वस्तु अ वरील काठी ही आरोपीच्या घरासमोर पडलेली होती व ती मी जप्त केली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा जप्ती पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, कोणताही पुरावा नसताना मी आरोपीविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

स्वा/–

ठिकाणः कळमेश्वर

(आर. एल. राठोड)

**दि. २८.०१.२०२६**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी, कळमेश्वर

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करते की, पी.डी.एफ. फाईल मधील साक्षपुरावा हे मुळ साक्षपुराव्या प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – आर.एम.परमाल (नि.श्रे.)